राष्ट्रीय शिक्षण संस्था, डोंबिवली संचालित

# स्वामी विवेकानंद आदिवासी आश्रमशाळा

## चिंध्याची वाडी

### पो. वाशाळा, ता. शहापूर, जि.ठाणे

सप्रेम नमस्कार,

ठाणे जिल्ह्यामध्ये वनवासी भागात राहणारा खूप मोठा समाज आहे. देश स्वतंत्र होऊन ६०-६२ वर्षे झाली तरी हा समाज दारिद्र्यात जगत आहे आणि अनेक सुविधांपासून वंचित आहे.अजूनही तो दऱ्याखोऱ्यात रहात आहे. या आपल्या वनवासी बांधवांची उन्नती, प्रगती व्हावी आणि इतर समाजाच्या बरोबरीने तो पुढे यावा, यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. म्हणून या बांधवांना ज्ञानाची कवाडे खुली व्हावीत व खऱ्या अर्थाने क्रांती व्हावी, यासाठी राष्ट्रीय शिक्षण संस्था, डोंबिवलीने आपल्या रौप्यमहोत्सवाचे वेळी वनवासी क्षेत्रात प्रकल्प राबविण्याचे ठरविले होते. याला अनुसरुन संस्थेने शासनाच्या परवानगीने दि. १ फेब्रुवारी, १९९९ रोजी फुगाळे, ता. शहापूर, जि.ठाणे या गावी स्वामी विवेकानंद आदिवासी आश्रमशाळा या नावाने शाळा सुरु केली. सुरुवातीला इ.१ली व इ.२ री चे वर्ग सुरु करण्यात आले. त्यावेळी २६ विद्यार्थी होते व शाळेची एकच छोटीशी इमारत होती. इतर वर्ग गावातील लोकांच्या घरी भरत. याठिकाणी पुढे इ. ७ वी पर्यंत वर्गवाढ झाली. ३०० विद्यार्थी शिक्षण घेत होते. परंतु फुगाळे गाव हा अतिशय दुर्गम, सह्याद्रीच्या पायथ्याशी, कसारा स्थानकापासून १८ कि.मी अंतर. फुगाळे गावी जाणे म्हणजे ८ कि.मी.प्रवास पायी करावा लागे. तसेच शाळेची इमारत बांधण्याकरिता तेथे जमीन उपलब्ध होऊ शकत नसल्याने शासनाच्या परवानगीने जून २००४ पासून शाळेचे स्थलांतर चिंध्याचीवाडी, ता.शहापूर, जि.ठाणे या ठिकाणी झाले. चिंध्याचीवाडी या ठिकाणी १० खोल्यांची सुसज्ज इमारत, स्वयंपाक घर, मुलींचे वसतीगृह, शिक्षक निवास यांचे परिपूर्ण बांधकाम झालेले आहे. या ठिकाणी इ.७ वी पर्यंतच शिक्षणाची सोय असल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण इ. ७ वी नंतर थांबे. तो विद्यार्थी आपल्या गावी जाऊन पुन्हा मोलमजुरी किंवा परंपरागत व्यवसाय करत असे. हे लक्षात घेऊन संस्थेने ३ वर्षांपूर्वी शासनाच्या परवानगीने माध्यमिक शाळेचा म्हणजे इ.८ वी चा वर्ग सुरु केला. सध्या या शाळेत ४०० विद्यार्थी इ. १ ली ते इ. १० वी पर्यंत शिकत आहेत. नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुका व शहापूर तालुक्यातील विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत.



आश्रमशाळेतील वर्ग

या वनवासी मुलांची शहरी भागातील मुलांबरोबर प्रगती व्हावी म्हणून संस्था व शाळा नेहमीच प्रयत्नशील असते. त्यासाठी विविध स्पर्धा, सहशालेय उपक्रम राबविले जातात. आज शहापूर तालुक्यात शैक्षणिकदृष्ट्या एक प्रगतीशील शाळा म्हणून आपल्या आश्रमशाळेचा उल्लेख केला जातो. भविष्यात महाराष्ट्रातील एक उल्लेखनीय अशी ही आश्रमशाळा व्हावी यासाठी संस्था व शाळेचा प्रयत्न चालू आहे.



स्वयंपाक घर व कर्मचारी निवास

सध्या मुलांचे वसतीगृह, प्रयोगशाळा व कार्यालयाचे बांधकाम चालू आहे. अजूनही अनेक सोईसुविधांची गरज आहे. ह्या सर्व सोईसुविधा पूर्ण करण्यासाठी आपल्यासारख्या सामाजिक संस्था, दानशूर व्यक्तींची सतत मदत होत असते. यापुढे अशीच मदत राहील अशी अपेक्षा आहे.

आपण शाळेला एकदा भेट देऊन या सामाजिक व शैक्षणिक कार्यात सहभागी होऊन सढळ हस्ते मदत करावी, ही नम्र विनंती. देणगी, आर्थिक सहाय्याचा धनादेश "राष्ट्रीय शिक्षण संस्था, डोंबिवली" या नावे पाठविण्यात यावा. आश्रमशाळेकरिता राष्ट्रीय शिक्षण संस्थेला दिलेल्या देणग्या ८० जी अंतर्गत आयकरांत सूट मिळण्यास पात्र आहेत.

कार्यवाह
राष्ट्रीय शिक्षण संस्था, डोंबिवली

## शाळेत राबविले जाणारे विविध उपक्रम

- क्रीडा स्पर्धा
- सांस्कृतिक कार्यक्रम
- शैक्षणिक सहल
- निसर्ग भेट
- पर्यावरण अभ्यास वर्ग
- व्यक्तिमत्व विकास वर्ग
- सामान्य ज्ञान परीक्षा
- चित्रकला स्पर्धा
- योगासने व सूर्यनमस्कार वर्ग
- व्यायाम व कवायत प्रकार
- वक्तृत्व स्पर्धा
- हस्ताक्षर स्पर्धा
- निबंध स्पर्धा



खेळणारी मुले



शाळेतील वर्ग खोली